दै. सकाळ
27 डिसें 2013

# छेडछाडीविरोधात पोलिसांत तक्रार द्या

» पान १ वरून

अपर पोलिस अधीक्षक ज्योतिप्रिया सिंह यांनी, कोणी त्रास देत असेल तर तुम्ही गप्प बसला तर त्यांचे धाडस वाढत जाईल. त्रास देणाऱ्या टवाळखोरांविरोधात तक्रार देण्याचे धाडस दाखवा. महाविद्यालयात लावलेल्या फलकावरील पोलिसांच्या क्रमांकावर फोन करा. तक्रार पेटीचा आधार घ्या. तुमचे नाव गोपनीय ठेवून टवाळखोरांचा बंदोबस्त केला जाईल. पोलिस तुमच्याबरोबर आहेत, असे सांगितले. याप्रसंगी पोलिस निरीक्षक मा. शां. पाटील यांनी, एकाही मुलीने पुढे येऊन माझी छेड काढणाऱ्याला मी धडा शिकविला, असे सांगितले नाही. स्त्री सबला असून मोठी शक्ती असल्याचे सांगितले. यावेळी शाहूवाडीच्या पोलिस उपअधीक्षक वैशाली माने, प्राचार्य क्रांतिकुमार पाटील, उपप्राचार्य एस. एन. कोळेकर, प्राध्यापक उपस्थित होते. कार्यक्रमानंतर ज्योतिप्रिया सिंह यांची स्वाक्षरी घेण्यासाठी विद्यार्थिनींनी मोठी गर्दी केली होती.

## गस्त घालण्याचे आदेश

प्रत्येक पोलिस ठाण्यांना हद्दीतील महाविद्यालय, बसस्थानक, रेल्वे स्टेशन, मॉल, चित्रपटगृहे या ठिकाणी गस्त घालण्याचे आदेश अपर पोलिस अधीक्षक ज्योतिप्रिया सिंह यांनी दिले आहेत. त्याप्रमाणे आज सकाळी प्रत्येक महाविद्यालयात जाऊन मुलींच्या समस्या समजून घेतल्या. त्यांना गुलाबपुष्प दिली गेली. या उपक्रमात महिला पोलिसांची संख्या मोठी होती.